**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्याची अर्थव्यवस्था २०३२ मध्ये एक ट्रिलियन डॉलर इतकी बनेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं विधानसभेत प्रतिपादन**
2. **राज्यसभेच्या ३७ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना निवडणूक आयोगाकडून जारी, राज्यातल्या सात जागांचा समावेश**
3. **विदर्भात उष्णतामानात वाढ, काही जिल्हयात कमाल तापमान ३५ अंश सेल्सियसच्या पुढे**
4. **टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि झिम्बाब्वे यांच्या दरम्यान सामना रंगणार**

**विधिमंडळ**

महाराष्ट्र ही देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून २०३२ मध्ये ती एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेला ते आज उत्तर देत होते. राज्याची अर्थव्यवस्था गेल्या अकरा वर्षांत १३ लाख कोटींवरून वाढून ५१ लाख कोटींवर गेली आहे, म्हणजे अर्थव्यवस्थेत तिप्पट वाढ झाली आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तसंच महाराष्ट्र तीस लाख कोटींचं जीएसटी संकलन करतो, देशाच्या जीएसटीतला वाटा चालू आर्थिक वर्षात १४ टक्क्याच्या आसपास राहील असं मुख्यमंत्री म्हणाले. दावोस मध्ये झालेल्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी होत आहे तर २०२५ मध्ये झालेल्या करारांपैकी ८२ टक्के करारांची अंमलबजावणी होत आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. यात ८३ टक्के परकीय गुंतवणुकीचा समावेश असून देशातील एकूण परकीय गुंतवणुकीच्या ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात होते असं त्यांनी नमूद केलं. राज्याचा बेरोजगारी दर २०२५-२६ मध्ये ३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

***राज्य विधानसभेत आज पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला सुरुवात झाली. यंदा पुरवणी मागण्या अकरा हजार कोटींवर आल्या. श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, शिवभोजन योजना अशा योजनांसाठी निधी मिळत नाही. जिल्हा परिषद***

*शाळा बंद पडत आहेत, अनेक शाळांत शिक्षक नाहीत, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ट्रेनिंग सेंटर नाही अशा तक्रारींचा पाढा कॉंग्रेस नेते नितीन राऊत यांनी वाचला. या विभागांना तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली. सारथी योजनेअंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ३८८ विद्यार्थ्यांना ७ कोटी २४ लाख रुपये शिष्यवृत्तीची रक्कम वितरित झाली. शिष्यवृत्तीप्राप्त उर्वरित ३७९ विद्यार्थ्यांसाठीची ५ कोटी ९६ लाख रुपये शिष्यवृत्तीची रक्कम ३१ मार्च पर्यंत वितरीत करावी अशा सूचना दिल्या आहेत असं सरकारकडून विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगण्यात आलं. जयंत पाटील, अभिजित पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. ही योजना पुढेही सुरू राहील असं सरकारने स्पष्ट केलं.राज्यातील सर्व समाज कार्य महाविद्यालयांतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर शासन सकारात्मक भूमिका घेत असून अनेक निर्णय प्रक्रियेत आहेत, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विधान परिषदेत दिली.दरम्यान राज्यात एक नवी औद्योगिक क्रांती होत असून महाराष्ट्राच्या विकासाची गती आता कुणीही थांबवू शकणार नाही. औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र आजही देशात क्रमांक एकचे राज्य आहे. राज्यात सुरू असलेल्या विकासयात्रेचे प्रतिबिंब राज्यपलांच्या अभिभाषणात उमटले असून प्रगत, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवणे हेच सरकारचे प्रमुख ध्येय आहे असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली. राज्यपालांच्या अभिभाषणावर विधान परिषदेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी भाषणाची सुरुवात दिवंगत नेते अजित पवार यांच्या आठवणीने केली. अजितदादांच्या निधनामुळे या अधिवेशनावर दुःखाचे सावट असून त्यांनी नेहमी विकासाचं राजकारण केल्याचं उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितलं.*

**द्वैवार्षिक निवडणुक**

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना निवडणूक आयोगाने जारी केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या सात जागांचा समावेश आहे. आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, पाच मार्चपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. सहा मार्च रोजी अर्जांची छाननी होईल, तर नऊ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. निवडणूक आवश्यक ठरल्यास १६ मार्च

रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी केली जाणार आहे. शरद पवार यांच्यासह राज्यातल्या सात सदस्यांचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपत आहे.

**ई-बॉण्ड**

महसूल विभागाच्या सेवा अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी राज्य सरकारने नोंदणी प्रक्रियेसाठी ऑनलाइन ई-बॉण्डची सुविधा सुरू केली असल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.या सुविधेमुळे नागरिकांना घरबसल्या ई-बॉण्डद्वारे मुद्रांक शुल्क ऑनलाइन भरणे शक्य होणार आहे.तसेच राज्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' राबवण्याची तयारी सुरू असून मार्च ते मे महिन्या दरम्यान मंडळस्तरावर शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. या शिबिरांत महसूल विभागाच्या सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

**भूकंपाचे धक्के**

गडचिरोली जिल्ह्यात काल रात्री १२ वाजताच्या सुमारास जिल्ह्याच्या दक्षिण भागातील सिरोंचा आणि अहेरी तालुक्यात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. यामुळे नागरिकांत भीती निर्माण झाली. काल रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी सिरोंचा तालुक्यासह अहेरी तालुक्यातील अहेरी, आलापल्ली, नागेपल्ली आणि अन्य ठिकाणच्या नागरिकांना जमिनीला कंपने जाणवली. या भूकंपाचा केंद्रबिंदू तेलंगणा राज्यातील मंचेरियल जिल्ह्यातील रामगुंडमपासून ३५ किलोमीटर अंतरावर होता. भूकंपाची तीव्रता ३.९ रिश्टर स्केल नोंदविण्यात आली. मागील पाच वर्षांत गडचिरोली जिल्ह्यात पाच वेळा भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. ३१ऑक्टोबर २०२१ रोजी संध्याकाळी सिरोंचा, अहेरी, चामोर्शी आणि मुलचेरा तालुक्यातील अनेक गावांमध्ये भूकंपाचे धक्के बसले होते. या भूकंपाची तीव्रता ४.३ रिश्टर स्केल एवढी होती. ४ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या भूकंपाची तीव्रता ही ५.३ रिश्टर स्केल एवढी होती.

**पोर्श अपघात प्रकरण**

पुण्यातल्या पोर्श अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचे वडील, विशाल अग्रवाल अंतरिम जामीन अर्ज आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला. आरोपीचे वकील मुकुल रोहतगी यांनी अग्रवालच्या अंतरिम जामिनाची विनंती केली होती. पुण्यात १९ मे २०२४ ला झालेल्या पोर्श अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. ही गाडी अल्पवयीन मुलगा चालवत होता. या अपघातानंतर मुलाच्या रक्त चाचणी अहवालात फेरफार केल्याचा आरोप विशाल अग्रवाल यांच्यावर ठेवला आहे. न्यायमूर्ती बी. व्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भूयान यांच्या पीठासमोर पुढची सुनावणी ३ मार्चला होणार आहे.

**दीक्षांत समारंभ**

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर चा चौथा दीक्षांत समारंभ येत्या शनिवारी, २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता बुटीबोरी नजीक वारंगा येथील विद्यापीठ परिसरात होणार आहे. या समारंभास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थान न्यायमूर्ती अतुल एस. चंदूरकर भूषविणार आहेत. यावेळी माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती शरद बोबडे, न्यायमूर्ती भूषण गवई तसेच न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांची उपस्थिती लाभणार आहे. या दीक्षांत समारंभात २१३ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात येणार असून गुणवंत विद्यार्थ्यांना २५ सुवर्णपदके देण्यात येणार आहेत. दरम्यान याच दिवशी, संध्याकाळी चार वाजता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या परिसरात न्यायदेवतेच्या मूर्तीच्या अनावरणाचा कार्यक्रम या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

**सावरकर पुण्यतिथी**

आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी. यनिममित्या देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे.जाज्वल्य राष्ट्रभक्तीचा हूंकार, थोर क्रांतिकारक, हिंदुत्ववादी विचारांचे विद्यापीठ स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना पुण्यतिथीदिनी कोटी कोटी नमन...अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांना आदरांजली वाहिली आहे. दरम्यान दादर इथले त्यांचे निवासस्थान हे सावरकर प्रेमींसाठी मंदिरासारखे आहे, त्यांचं हे निवासस्थान राष्ट्रीय स्मारक बनवलं पाहिजे अशी मागणी विधान परिषदेचे नेते संजय उपाध्याय यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना केली आहे.

**उच्च न्यायालय**

प्रेमभंग हे आत्महत्येला प्रवृत्त करण्यासाठीचं कारण होऊ शकत नाही असं महत्वपूर्ण मत दिल्ली उच्च न्यायालयानं नोंदवलं आहे. आत्महत्येला प्रवृत्त केल्या बाबतच्या गुन्ह्यातल्या व्यक्तीला जामीन मंजूर करताना न्यायालयानं हे म्हटलं आहे. या व्यक्तीच्या लग्नानंतर त्याच्या माजी प्रेयसीनं आत्महत्या केली होती. या आत्महत्येबाबत त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला होता. प्रेमभंग म्हणजे आत्महत्येशिवाय पर्याय नसणारी परिस्थिती नसल्याचं जामीन मंजूर करताना न्यायालयानं म्हटलं आहे.

**विश्व मराठी संमेलन**

चौथे विश्व मराठी संमेलन उद्यापासून नाशिकच्या होणार आहे. या पार्श्वभूमीवर आज बोली भाषांचा महोत्सव आयोजित करण्यात आला . या संमेलनाचं उदघाटन ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते महाकवी कालीदास कला मंदिरात

करण्यात आलं . बोली भाषा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. याच बोली भाषांनी मराठी भाषेला समृद्ध आणि संपन्न केलं आहे, असं प्रतिपादन यावेळी कर्णिक यांनी केलं .

**टीट्वेंटी**

टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट चा पहिल्या गटाच्या सामन्यांमध्ये आज भारत आणि झिम्बाब्वे यांच्यादरम्यान सामना होणार आहे. चेन्नईत एमए चिदंबरम मैदानावर आज संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरु होईल. भारताला उपान्त्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी आजचा सामना तसंच येत्या रविवारचा वेस्ट इंडिजबरोबरचा सामना या दोन्हीमध्येही विजय मिळवणं आवश्यक आहे.

**हवामान**

विदर्भातील सर्व जिल्ह्यात किमान तापमानात वाढ नोंदवली जात असून आज चंद्रपूर जिल्ह्यात 21अंश सेलसियस इतक्या किमान तापमानाची नोंदणी करण्यात आली. त्या पाठोपाठ अकोला इथं 20 अंश तर बुलढाणा इथं 19अंश सेलसियस इतकं किमान तापमान नोंदविण्यात आलं. त्याच प्रमाणात कमाल तापमान देखील वाढत आहे. अकोला जिल्ह्यात 36 तर अमरावती आणि चंद्रपूर जिल्ह्यात 35 अंश सेलसियसच्या घरात कमाल तापमान आहे.

*****